**महाराष्ट्र शासन**
**नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग**
**सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे**
**जाहिरात क्रमांक २/२०२५**

या कार्यालयाने प्रसिद्ध केलेली जाहिरात क्र. ३/२०२४, दि.०९.१०.२०२४, प्रशासकीय कारणास्तव रद्द करण्यात येऊन, महाराष्ट्र शासनाच्या नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभागांतर्गत पुणे /कोकण / नागपूर / नाशिक / छत्रपती संभाजीनगर/ अमरावती विभागातील अनुरेखक (गट-क) संवर्गातील रिक्त पदांवर नियुक्तीसाठी पात्र उमेदवारांकडून केवळ ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरावयाची सुविधा महाराष्ट्र शासनाच्या www.urban.maharashtra.gov.in व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या www.dtp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर दि. १९.०६.२०२५ रोजी, १७:०० वाजल्यापासून उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच जाहिरात रोजगार व स्वयंरोजगार संचालनालयाच्या https://ese.mah.nic.in या संकेतस्थळांवर देखील उपलब्ध होईल.

❖ **रिक्त पदांचा तपशील** :-

| अ.क्र. | संवर्ग | पदाचे नाव | वेतनश्रेणी | एकूण पदे |
|---|---|---|---|---|
| १ | गट-क | अनुरेखक | वेतनस्तर : एस-०७ ,रु.२१७००-६९१०० अधिक नियमानुसार अनुज्ञेय भत्ते | १२६ |

**अनुरेखक (गट-क) संवर्गातील भरावयाच्या पदांचा विभाग निहाय सविस्तर तपशील विभागाच्या संकेतस्थळावर परिशिष्ट-१ मध्ये प्रसिध्द केल्याप्रमाणे आहे.**

❖ **वेळापत्रक**

| अ.क्र. | कार्यवाहीचा टप्पा | दिनांक व कालावधी |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन अर्ज सादर करणेचा कालावधी | दि. १९/०६/२०२५ रोजी १७:०० वाजलेपासून दि.२०/०७/२०२५ रोजी २३:५९ वाजेपर्यत |
| २ | ऑनलाईन पध्दतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | दि. २१/०७/२०२५ रोजी २३.५९ वाजेपर्यत |
| ३ | प्रवेशपत्र ऑनलाईन प्रिंट काढून घेणे | याबाबत www.dtp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर सूचना प्रसिध्द करण्यात येईल. |
| ४ | ऑनलाईन परीक्षेचा दिनांक | |

**टिप** –

१. अनुरेखक पदासाठी ऑनलाईन परीक्षा स्वतंत्रपणे स्वतंत्र वेळापत्रकानुसार घेण्यात येतील. याबाबतच्या सूचना वेळोवेळी विभागाच्या www.dtp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील. अशा सूचनांचे वेळोवेळी अवलोकन करण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.
२. उमेदवारांच्या संख्येस अनुसरून आवश्यकतेनुसार वेगवेगळया दिवशी वेगवेगळ्या सत्रांमध्ये परीक्षा घेण्यात येतील.
३. अनुरेखक या पदासाठीची परीक्षा २ स्तरांवर घेण्यात येणार असून प्रथमतः बहुपर्यायी ऑनलाईन पद्धतीने घेतलेल्या परीक्षेमध्ये किमान ४५% किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविलेल्या पात्र उमेदवारांचीच व्यावसायिक चाचणी परीक्षा स्वतंत्रपणे, स्वतंत्र वेळापत्रकानुसार घेण्यात येईल.

❖ **सेवा प्रवेश नियमानुसार आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता -**

| अ.क्र | पद | शैक्षणिक व तांत्रिक अर्हता |
|---|---|---|
| १ | अनुरेखक (गट-क) | **शैक्षणिक अर्हता** - माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर मान्यताप्राप्त शासकीय संस्थेतून दोन वर्षांचे स्थापत्य किंवा वास्तुशास्त्रीय आरेखक पाठ्यक्रम उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र; किंवा शासनाने वेळोवेळी घोषित केलेली इतर कोणतीही समतुल्य अर्हता.<br><br>**तांत्रिक अर्हता** - मान्यताप्राप्त संस्थेतून स्वयं-संगणक सहाय्यित आराखडा (ऑटो-कॅड) किंवा अवकाशीय नियोजन यामध्ये भौगोलिक माहिती प्रणाली (जी.आय.एस.) परीक्षा उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे.<br><br>**परंतु, उमेदवारांनी राष्ट्रीय कौशल्य अर्हता संरचना (एनएसक्यूएफ) यांचेशी संलग्न स्थापत्य किंवा वास्तुशास्त्रीय आरेखक पाठ्यक्रम उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र धारण केलेले असल्यास त्याला मान्यताप्राप्त संस्थेतून स्वयं-संगणक सहाय्यित आराखडा (ॲटोकॅड) किंवा अवकाशीय नियोजन यामध्ये भौगोलिक माहिती प्रणाली (जी.आय.एस.) परीक्षा उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र धारण करण्यापासून सूट देण्यात येईल.** |

**टिप- प्रस्तुत जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर करण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांकास उमेदवाराने संबंधित शैक्षणिक व तांत्रिक अर्हता धारण करणे आवश्यक आहे.**

❖ **वयोमर्यादा :-**

१) उक्त पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराचे वय अर्ज सादर करणेच्या अंतिम दिनांकास किमान वय १८ वर्षे पूर्ण असावे व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

२) मागासवर्गीयांसाठी / खेळाडूंसाठी / आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी / सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गासाठी / उमेदवारांच्या बाबतीत वयोमर्यादा ०५ वर्षे शिथिलक्षम राहील. तसेच दिव्यांग, भूकंपग्रस्त व प्रकल्पग्रस्त-उमेदवारांसाठी उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत तसेच पदवीधर अंशकालीन उमेदवारांसाठी उच्चतम वयोमर्यादा ५५ वर्षांपर्यंत शिथिलक्षम राहील. शासन निर्णय क्र.मासैक-१०१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ, दि.२०.०८.२०१० मधील तरतूदीनुसार माजी सैनिक उमेदवारांच्या बाबतीत विहित वयोमर्यादेतील सूट ही त्यांचा सशस्त्र दलात झालेल्या सेवे इतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील.

३) मागासवर्गीय उमेदवार, दिव्यांग, खेळाडू, प्रकल्पग्रस्त, अंशकालीन कर्मचारी आणि माजी सैनिक यांना असलेली वयोमर्यादेतील शिथिलतेची कोणतीही अधिकतम असलेली एकच सवलत देय राहील.

❖ **परीक्षा शुल्क :-**

| **अराखीव (खुला) प्रवर्ग - १०००/-** | **राखीव प्रवर्ग - ९००/-** |
|---|---|
| **माजी सैनिकांसाठी परीक्षा शुल्क आकारले जाणार नाही.**<br>उपरोक्त परीक्षा शुल्काव्यतिरिक्त बँक चार्जेस तसेच त्यावरील देय कर अतिरिक्त असतील. | |

❖ प्रस्तुत जाहिरातीमध्ये पदभरती संदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज स्वीकारण्याची पद्धत, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या इ. बाबतचा तपशिल **www.urban.maharashtra.gov.in**, **www.dtp.maharashtra.gov.in** व **https://ese.mah.nic.in** या संकेतस्थळांवरील "सर्वसाधारण सूचना" मध्ये लिंक प्रसिध्द करतेवळी उपलब्ध करुन देण्यात येईल.

❖ भरती प्रक्रिया संदर्भातील सर्व कार्यक्रम, कार्यक्रमातील बदल, सूचना वगैरे **www.dtp.maharashtra.gov.in** या संकेतस्थळांवर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येतील. याबाबत उमेदवारांशी कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नसून या संकेतस्थळावरुन माहिती उपलब्ध करुन घेण्याची दक्षता उमेदवारांनी घ्यावयाची आहे.

❖ स्पर्धात्मक परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अंशतः बदल करणे, पदांच्या एकूण संख्येमध्ये बदल करण्याचे अधिकार शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना तसेच संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल. याबाबत कोणताही दावा करता येणार नाही.

दिनांक : १६.०६.२०२५
ठिकाण : पुणे.

(कल्याणी ल.पाटील)
सदस्य सचिव,
राज्यस्तरीय निवड समिती, पुणे
तथा
सहायक संचालक, नगर रचना,
पुणे विभाग, पुणे.

(ग्रं.म.पवार)
अध्यक्ष,
राज्यस्तरीय निवड समिती, पुणे
तथा
सहसंचालक, नगर रचना,
पुणे विभाग, पुणे.

F:\TRACER\अनुरेखक_7.10.24 (1).docx